**महाराष्ट्र शासन**

गृह विभाग,
नविन प्रशासन भवन, १२ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
Email ID: home_hdo१@maharashtra.gov.in

क्रमांक : एचडीओ-०१२४/प्र.क्र.०४/आस्था-१ दिनांक :१२ मार्च, २०२५.

## जाहिरात

गृह विभागाच्या विविध आस्थापनेवरील गट-अ, गट-ब आणि गट-क अधिकारी /कर्मचारी यांच्या प्रलंबित विभागीय चौकशी पूर्ण करण्यासाठी कंत्राटी चौकशी अधिकारी आणि चौकशी अधिकाऱ्यास सहायक अधिकारी यांचे पॅनेल (सामाईक यादी) तयार करण्यात येत असून यासाठी सुयोग्य उमेदवारांकडून अर्ज मागवित आहे.

गृह विभागांतर्गत खालील आस्थापनेचे कामकाज हाताळले जाते :-

१) पोलीस विभाग.
२) न्यायसहाय्य वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय.
३) कारागृह विभाग.
४) अभियोग संचालनालय,

उपरोक्त नमूद आस्थापनेवरील प्रलंबित विभागीय चौकशीचे प्रकरणे विचारात घेता, सदरहू प्रलंबित विभागीय चौकशा विहित केलेल्या कालावधीमध्ये पूर्ण करण्यासाठी, याद्वारे चौकशी अधिकारी आणि चौकशी अधिकाऱ्यास सहायक अधिकारी यांचे पॅनेल तयार करण्यासाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची इच्छूकता मागविण्यात येत आहे. सदरचे दोन पॅनेल खालीलप्रमाणे तयार करण्यात येत आहेत:-

| | |
|---|---|
| पॅनेल-१ | चौकशी अधिकारी, |
| पॅनेल-२ | चौकशी अधिकाऱ्यास सहायक अधिकारी |

कामाचे स्वरुप व पात्रता :-

| पॅनेल | पात्रता | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| चौकशी अधिकारी | वेतन श्रेणी:- वेतनस्तर (Level) १३ व त्यावरील.<br>वय :- ७० वर्ष पेक्षा कमी.<br>• केंद्र किंवा राज्य शासकीय सेवेतील कोणताही सेवानिवृत्त अधिकारी.<br>• विभागीय चौकशीचे कामकाज अथवा विभागीय चौकशी प्रकरणांचे परिवेक्षीय कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>• मराठी व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक.<br>• अन्य विभागाच्या पॅनेलवरील चौकशी अधिकारी म्हणून किंवा इतर सेवेत कार्यरत नसावा. | • चौकशीसाठी सोपविलेल्या प्रकरणाची आस्थापनेच्या विभागीय चौकशी नियमानुसार सविस्तर विभागीय चौकशी करणे.<br>• प्रकरण चौकशीसाठी सोपविल्यानंतर ४ महिन्यांच्या आंत चौकशी अहवाल शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्यास सादर करणे. |

| | | |
|---|---|---|
| चौकशी अधिकारी यांचे सहायक | वेतन श्रेणी:- वेतनस्तर (Level) १०/११/१२<br>वय :- ७० वर्ष पेक्षा कमी.<br>• राज्य किंवा केंद्र शासनाच्या सेवेतील कोणतेही सेवानिवृत्त अधिकारी.<br>• मंत्रालय,मुंबई येथील सेवानिवृत्त अवर सचिव /कार्यासन अधिकारी/ सहायक कक्ष अधिकारी किंवा राज्य शासनाच्या सेवेतील अन्य अधिकारी.<br>• मराठी आणि इंग्रजी भाषेमध्ये टिप्पणी व मसूदा लेखन तयार करण्यात सक्षम आवश्यक<br>• मराठी व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक.<br>• अन्य विभागाच्या आस्थापनेवर किंवा इतर सेवेत कार्यरत नसावा.<br>• सामान्य प्रशासन विभाग/ आस्थापना विषयक बाबी किंवा वित्त विभागामधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना प्राथम्य देण्यात येईल. | • विभागीय चौकशी अधिकाऱ्याला चौकशी करण्यास सहाय्य करणे.<br>• चौकशी अधिकाऱ्याला नोटीशीचे मसूदे आणि अंतिम चौकशी अहवाल तयार करण्यास सहाय्य करणे. |

- निवड केलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे मानधन त्याचे शेवटचे वेतन वजा सेवानिवृत्त वेतन असे राहील. (Last Pay minus Pension)
- गृह विभागाने सोपविलेल्यां विभागीय चौकशी प्रकरणांची आणि त्यामधील अटी-शर्तीचे पालन करणे निवड केलेल्या अधिकाऱ्यांवर बंधनकारक राहील.
- इच्छूक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदरची जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत त्यांची इच्छूकता खाली नमूद केलेल्या पत्यावर पाठवाव्यात:-

श्री. प्रशांत बडगेरी, सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, २ रा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
ई-मेल:- prashant.badgeri@nic.in

सदरची जाहीरात महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.maharashtra.gov.in यावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(प्रशांत बडगेरी)
सह सचिव,गृह विभाग

# अर्जाचा नमुना

१) अधिकाऱ्याचे नांव :-

२) ज्या पदासाठी इच्छूक आहात ते पद :- चौकशी अधिकारी /
चौकशी अधिकारी यांचे सहायक
*(वरीलपैकी इच्छूक पर्यायावर टिक करावे)*

३) पत्ता :-

४) मोबाईल क्रमांक :-

५) ई-मेल आय. डी. :-

६) जन्म दिनांक :-

७) दि.१.१.२०२५ रोजीचे वय :-

८) सेवानिवृत्तीचा दिनांक :-

९) सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद व पे-स्केल :-

१०) सेवानिवृत्तीपूर्वी घेतलेले शेवटचे वेतन :-

११) सध्या सेवानिवृत्ती वेतन :-

१२) ज्या विभागातून सेवानिवृत्त झाले तो विभाग / कार्यालय :-

१३) विभागीय चौकशीच्या कामाचा अनुभव :-

१४) विभागीय चौकशी मध्ये पूर्ण केलेल्या कामाचा सविस्तर तपशील:-

१५) सेवेत असताना झालेली शिक्षा किंवा
विभागीय चौकशीस सामोरे गेले आहेत किंवा कसे :-

१६) असल्यास, त्याचा सविस्तर तपशील :-

**अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**